
VOL. 3
SPECIAL ISSUE 1
MARCH 2017

ISSN: 2454-5503
Impact factor : 3.012 (IIJIF)

# CHRONICLE
## OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL



Special Issue On

## RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS IN PRESENT ERA

(Book I)

*Chief Editor*
Dr. Shailaja Barure

*Co Editor*
Mr. Dhanaji Arya

BY
GANDHIAN STUDIES CENTRE,
SHRI YOGESHWARI EDUCATION SOCIETY'S
SWAMI RAMANAND TEERTH MAHAVIDYALAYA,
AMBAJOGAI, DIST. BEED - 431517

Scanned by CamScanner

**अनुक्रमणिका....**


१. महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार / प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव / १२
२. महात्मा गांधीजींची 'मूलभूत शिक्षण व्यवस्था' -एक विवेचन / डॉ. भालेराव जे.के. / १७
३. महात्मा गांधीजींचे तत्वज्ञान आणि भारतीय लोकशाही समोरील आव्हाने /प्रा. डॉ. शैलजा बरुरे / २१
४. ग्रामीण पुर्नबांधणीचा गांधीजींचा दृष्टीकोन/ प्रा.डॉ.घायाळ एस.पी. / ३२
५. महात्मा गांधी प्रणित ग्रामीण विकास / डॉ. पी.आर. थारकर / ३७
६. गांधीजीचे समता विषयक विचार / डॉ रंजनी अनंतराव बोरोळे / ४२
७. महात्मा गांधी आणि महिला सबलीकरण / अमित रामकृष्ण अरगडे / ४७
८. वर्तमानकालीन भारतीय समाजव्यवस्थेत गांधी तत्वज्ञानाची उपयुक्तता / प्रा. सुनिता टेंगसे / ५३
९. महात्मा गांधी आणि त्यांचे कृतिशील विचार : एक अभ्यास / प्रा.राम मायकर / ५९
१०. महात्मा गांधींचे समाजिक विचार / कु.पवार एस.एम. / ६३
११. खादी आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग / सौ.कविता अभय पांडे / ६८
१२. Mahatma Gandhi as a social Reformer / सौ.प्रार्थना लोहेकर / ७०
१३. महात्मा गांधीचा ग्रामीण विकासाबद्दल दृष्टीकोन /डॉ.एम.डी. कच्छवे / ७३
१४. महात्मा गांधीजींचा समतेविषयक दृष्टिकोन / प्रा. जोगदंड एम.बी./ प्रा. गंगणे ए. यु. / ७७
१५. महात्मा गांधी आणि महिला विषयक दृष्टीकोन /प्रा.गडदे भारती बा. / ८२
१६. महात्मा गांधींच्या अध्यात्मनिष्ठ मानवतावादी विचारांची प्रासंगिकता / डॉ.नारायण तु.कांबळे / ८८
१७. महात्मा गांधीजींचे कृषी विषयक विचार/ देशमुख विठ्ठल शंकरराव / ९३
१८. महात्मा गांधीजींच्या बुनिवादी शिक्षण पध्दतीची विद्यमान काळातील प्रासंगिकता / डॉ. अरुण दळवे / ९५
१९. महात्मा गांधींचे शिक्षण विषय विचार / प्रा.गंगाधर चव्हाण, प्रा. संजय राठोड / १०२
२०. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि गांधीजी : एक अभ्यास / डॉ.के.व्ही.डोंगरगावकर / १०४
२१. महात्मा गांधीच्या 'खेडयाकडे चला' ऐतिहासिक हाकेचे मराठी साहित्यात स्थान / प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत / १०९
२२. महात्मा गांधीजींचे ग्रामस्वराज्यविषयी विचार / प्रा. घाडगे गौतम व्यं. / ११३
२३. गांधीजींच्या सत्याग्रहाची साधणे / श्रीमती एस. एन. जाधवर / ११९




Scanned by CamScanner

# १.

# महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार

**प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव**
**विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक**
**पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख**
देगलूर महाविद्यालय, देगलूर.
मो.क्रं.९४२३४३९२७६

**प्रस्तावना :** भारतात आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीयदृष्ट्या मागासलेल्या वर्गाविषयी चिंता अनेक समाजसुधारक, अभ्यासक व कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. ज्यामध्ये एक महत्वपूर्ण व्यक्तिमत्व आहे ते म्हणजे मोहनदास करमचंद गांधीजी. महात्मा गांधी या नावाने भारताच्या राजकारणात २० व्या शतकात एक फार मोठे वादळ निर्माण केले. ज्या वादळाच्या चक्रात ब्रिटीश सत्तारुपी वटवृक्ष पूर्णपणे मुळासकट उपटुन नेस्तनाबूत झाले. भारतात महात्मा गांधी या नावास व व्यक्तिमत्वास इतका अभूतपुर्व जनाधार का प्राप्त झाला ? खरेतर हा स्वतंत्र संशोधनाचा विषय होवू शकतो. त्यास अनेक घटक कारणीभुत असतील, परंतू त्यापैकी एक कारण म्हणजे गांधीनी या देशातील दलित समाजाप्रती कल्याण व हिताचा केलेला विचार त्यांच्या हितासपूरक मांडलेली रामराज्य व विश्वस्ताची संकल्पना, तसेच एक माणूस म्हणून समाजात ताठ मानेने उभे टाकण्यासाठी त्यांच्या शिक्षणाची केलेली सोय व ती पूर्ण करण्यासाठी मांडलेला शिक्षणाचा नई तालीम सिध्दांत.

प्रस्तुत लेखात महात्मा गांधीच्या शैक्षणिक स्थिती व ति सुधारण्यासाठी मांडलेल्या विचारावर प्रकाश टाकण्यात आला. ज्यासाठी प्रथमतः भारताच्या वर्तमान शैक्षणिक स्थितीपासून प्रारंभ करावा लागला. महात्मा गांधींनी दलित समाजाच्या शैक्षणिक स्थितीत सुधारणा व्हावी म्हणून काय उपाय केले यावर प्रकाश टाकण्याच्या हेतूनेच या लेखाचा प्रपंच केला आहे. संपूर्ण जगाच्या शैक्षणिक स्थितीचा विचार करतात भारतातच निरक्षरांचे प्रमाण अधिक आहे. या निरक्षरांना सुशिक्षित बनवण्यासाठी घटनाकारांनी तशा प्रकारची तरतूद राज्यघटनेत केली. तरी भारतातील शिक्षणाच्या विशेषतः दलित समाजाच्या शिक्षणाच्या स्थितीत सुधारणा झाली नाही. या देशातील सर्वसामान्य माणसाला निःशुल्क व अनिवार्य शिक्षण मिळावे यासाठी २०१० साली एक कायदा बनवण्यात आला. या कायद्याने सक्तिच्या शिक्षणाला मोफत करुन समाजातील कमकुवत व गरीब वर्गातील मुलांना आपले भविष्य सुधारण्याची संधी दिली. यामुळे भविष्यातील गरीब व श्रीमंत हा भेद नष्ट होईल. या



Scanned by CamScanner

देशातील घटनाकार व वर्तमानातील राज्यकर्ते धोरण निर्धारक व प्रशासकांच्या या चांगल्या उदयोन्मुख विचारसरणीने सक्तीच्या शिक्षणाचे महत्त्व वाढले.

महात्मा गांधीच्या नई तालीम मध्ये मातृभाषेतून शिकवण्यावर भर देण्यात आला. विद्यार्थ्यांना घरापासून दूर ठेवून शिक्षण देण्यास गांधींचा विरोध होता. कारण घरासारखे दूसरे श्रेष्ठ विद्यालय नाही. शिक्षणात नैतिकतेवर भर द्यावा. तसेच सहकार्याची भावना धार्मिक व जातीय भेदभाव आण द्वेषापासून दूर राहण्याची भावना विकसित करणे हा मुख्य उद्देश होता. त्यांच्या मते विद्यार्थ्यांना आपल्या जबाबदारीची जाणीव होइ्रल असे शिक्षण द्यावे. प्रत्येक काम सारखे असते तसेच प्रत्येक कामाला सन्मान मिळावा असे शिक्षण असावे. शिक्षणात रोजगार उत्पन्न होईल अशी कला शिकवावी. त्यासाठी त्यांना व्यावसायिक शिक्षण द्यावे. गांधीजींनी शिक्षणाचा संबंध मानवी मुल्यांशी जोडला. शिक्षण समाज हितासाठी काम करण्याची प्रेरणा देणारे तसेच विद्यार्थ्यात शांतता हा गुण विकसित करणारे असावे याशिवाय विभिन्न संस्कृती प्रति सन्मान व विश्वास जागृत करावे. विद्यार्थ्यांत वैज्ञानिक दृष्टीकोण विकसित करावा.

महात्मा गांधीनी भारतीय शिक्षणाला द ब्युटीफुल ट्री असे संबोधले आहे. महात्मा गांधींच्या शिक्षणविषयक विचारात ७ ते १४ वर्षाच्या पर्यंतच्या मुलांना नि:शुल्क व सक्तीचे शिक्षण द्यावे. शिक्षणाचा माध्यम मातृभाषा असावे. साक्षरता म्हणजे शिक्षण नव्हे. शिक्षण मुलामध्ये मानवी मुल्य विकसित करणारे असावे. शिक्षणाने बालकांचे शरीर ऱ्हदय, मन आणि आत्मा यांचा समान विकास व्हावा. सर्व प्रकारची शिक्षण स्थानिक उत्पादन व उद्योग यांच्या माध्यमातून द्यावे. नवतरुणांची बेरोजगारी मुक्त होणारे शिक्षण असावे. गांधींच्या मते शिक्षण म्हणजे बालक आणि मनुष्याच्या शरीर, मस्तिष्क आणि आत्म्यात सर्वोत्तम गुणांचा चहुमुखी विकास करणे होय.

महात्मा गांधींनी आपले शिक्षण विषयक विचार सांगताना त्याचे दोन उद्दिष्ट सांगितले १) शिक्षणाचा तत्कालीन उद्देश २) सर्वोच्च उद्देश. सर्वोच्च उद्देश यामध्ये शिक्षण आर्थिक गरजांची पूर्तता करून बालकांना आत्मनिर्भर बनवाणारे असावे. सांस्कृतिक शिक्षण हा शिक्षणाचा आधर आहे. मानवी वर्तनातून भारतीय संस्कृती स्पष्ट व्हावी. व्यक्तिचा पूर्ण विकास करणे हा शिक्षणाचा खरा उद्देश असतो. माणसाचे नैतिक अथवा चरित्रात्मक विकास हा शिक्षणाचा उद्देशअसतो. शिक्षा हेच माणसाला सर्वबंधनातून मुक्ती देणारे असते. आत्मविकासासाठी अध्यात्मिक स्वातंत्र्य शिक्षणातूनच मिळते. हे उद्देश साध्य करण्यासाठी सत्य प्राप्त करण्यावर भर द्यावा. आत्मानुभूती हाच शिक्षणाचा अंतीम उद्देश असतो.

१९३७ मध्ये महात्मा गांधींनी वर्धा येथे आखिल भारतीय राष्ट्रीय शिक्षण संमेलनात आपल्या मुलभूत शिक्षणाची योजना मांडली होती. ज्यात दहावी पर्यंत



Scanned by CamScanner

इंग्रजी या विषयाला समावेश नव्हता तसेच ती व्यवस्था उद्योगावर आधारित होती. गांधींनी या संमेलनात मांडलेल्या शिक्षण योजनेत मुलभूत शिक्षणाचा कालावधी वर्ष होता. हिंदी भाषेचा अभ्यास बालकांसाठी अनिवार्य होता. संपूर्ण शिक्षणाचा संबंध आधारभूत शिल्पांशी होता. शारिरीक श्रमाला महत्व होते. लहान मुलांकडून बनवलेल्या वस्तू बाजारात विकून महाविद्यालय चालवावे. मुले व मुली यांना समान अभ्यासक्रम असावा. अभ्यासक्रमात इंग्रजी आणि धर्माचे शिक्षण नसावे.

भारतासारख्या तीव्र गतीने विकसीत बनण्याची क्षमता बाळगणाऱ्या देशातील गरीब आई-वडील आपल्या मुलांना चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्यांच्या या मार्गात असंख्य अडचणी आहेत. यातील सर्वांत मोठी अडचण म्हणजे राजकीय इच्छाशक्ती व आर्थिक संसाधनांचा अभाव. प्रत्येक भारतीय मुलगा-मुलगी शिक्षणाच्या कक्षेत आला पाहिजे. तरच प्रत्येक भारतीयांचे चांगल्या जीवनाचे स्वप्न पूर्ण होवू शकते. सर्व वर्गांना समप्रमाणात शिक्षित करण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षणाच्या सुविधा मिळाव्यात. ज्या सर्व वर्गाच्या विकासासाठी सहाय्यभूत ठरतील. कोणतेही ध्येय किंवा स्वप्न मजबूत पायावरच पूर्ण होवू शकते. सर्वांना उच्च शिक्षण देण्यासाठी प्राथमिक स्तरावरील शिक्षण सक्तीचे व गुणवत्तापूर्ण असावे. भारतातील समाजनिहाय शिक्षणाच्या स्तराचा विचार करता सापडणारे उत्तर समाधानकारक नसेल पण फार विचार करायला लावणारे असेल. आदिवासी, दलित समाजात २१ च्या शतकाच्या माहिती तंत्रज्ञान युगात शिक्षणाचे प्रमाण फार कमी आहे. प्रस्तुत लेख दलित समाजाच्या शिक्षणाबाबतचा गांधीवादी दृष्टीकोन समजून घेण्याशी संबंधित आहे. त्यामुळे येथे दलित समाजाच्या शैक्षणिक स्थितीबाबतचाच आढावा घेण्यात आला तो ही गांधी नजरेतून. दलित समाजात अनेक जातींचा समावेश होतो. ज्यांच्यात शिक्षणाच्या प्रचार-प्रसाराचा स्तर फार कमी आहे. आज ही दलित समाजातील बालक घराची चौकट पार करुन शाळेच्या दरवाज्या पर्यंत जावू शकत नाहीत. ज्या समाजाच्या शैक्षणिक स्थितीचे प्रमाण कमी आहे. त्या समाजाच्या विकासाची चर्चा निरर्थक आहे. भारतीय राज्यघटनेतील कलम १५ (१), १५ (४) राज्य शासनास कोणत्याही सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या नागरिकांच्या प्रगतीसाठी विशेष तरतूद करण्याचे अधिकार देते. या वर्गाच्या शैक्षणिक व आर्थिक हित करण्याचे निर्देश राज्य शासनास देण्यात आले.

महात्मा गांधींनी स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व स्विकारण्यापूर्वीच दक्षिण आफ्रिकेतील जीवनापासूनच कमकुवत लोकांची साथ देण्याचा प्रण केला होता. ज्याची प्रचिती गांधीच्या भारतातील व्यवहारातून येते. महात्मा गांधी या देशातील एक प्रभावशाली आणि व्यावहारिक राजकारणी होते. त्यांच्या विचार आणि कार्याचा प्रभाव आजही समाजावर जाणवतो. ज्यात वर्तमानातील गांधीवादी पध्दतीने होणारे आंदोलन, बराक ओबामांचे गांधीवादी रुप, नरेंद्र मोदींचे स्वच्छता अभियान, महाराष्ट्रातील महात्मा गांधी तंटामुक्ती केंद्र इ.च्या माध्यमातून अनुभवता येते.



Scanned by CamScanner

दलितांची प्रगती, जाणीवा विकसित करण्यात महात्मा गांधीचे नाव अग्रसेर आहे. परंतू महात्मा गांधीने दलित समाजासाठी कांहीच केले नाही. त्यामुळे ते दलितांचे नेते नाहीत अशीही ओरड होत आहे. परंतू दलितांमध्ये चैतन्य विकसित करण्यात महात्मा गांधीचे योगदान अविस्मरणीय आहे. स्वातंत्र्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेत दलित समाजाच्या कल्याणार्थ ज्या-ज्या कलमांचा समावेश करण्यात आला त्यावर स्पष्टपणे महात्मा गांधींचा प्रभाव जाणवतो. संविधानानूसार शिक्षण केंद्र व राज्य या दोघांचाही विषय आहे. शिक्षणाच्या प्रचार-प्रसाराचे मुळ दायित्व राज्य शासनावर सोपवले आहे. केंद्र शासन उच्च शिक्षणात संशोधक, शास्त्रीय व तंत्रज्ञान शिक्षणाच्या क्षेत्रात सुविधा उपलब्ध करुन देण्यावर अधिक भर देत आहे. अनुसूचित जनजातींना दहावीनंतर शिष्यवृत्ती देणे, मुलगा-मुलगी निवास, मेडिकल व इंजिनियरिंग कॉलेजमध्ये आरक्षण विविध अभ्यासक्रमांचे नियमांत शिथिलता, शिष्यवृत्या, संशोधन शिष्यवृत्या, आश्रम शाळा इत्यादी मार्फत दलित वर्गाचा विकासासाठी शासन प्रयत्नशील आहे.

आज उच्च शिक्षण विभागामार्फत खेड्यातील मुलगी, प्रतिमा किरण योजना, उत्कृष्ट छात्र पुरस्कार, निवाऱ्याच्या सुविधा, पुस्तक बँक योजना, स्नातक आणि स्नातकोत्तर अध्ययनस्त, विद्यार्थी-विद्यार्थीनींसाठी पुस्तके व स्टेशनरी, विद्यार्थ्यांच्या प्रवासासाठी सुविधा इ. तरतूदींतून दलित, कमकुवत व मागासवर्गाच्या विकासासाठी अनेक उत्तम व संवेदनशील मार्गाने कार्य करुन त्यांना विकासाच्या मुख्यप्रवाहाशी जोडले जाते या सर्वांवर गांधीच्या विचाराचा प्रभाव जाणवतो.

दलित वर्गाच्या शैक्षणिक विकासासाठी महात्मा गांधीनी पुरक विचार व कार्य केले. गांधींनी ज्या आदर्श समाजाची कल्पना केली तो शोषणमुक्त होता. ते चरखाप्रणित समाजवादाचे समर्थक होत, ज्यात जे श्रम करतील त्यांचीच जमीन असेल. सहकार्य ग्रामीण जीवनाचा आत्मा आहे. प्रत्येक व्यक्तिला काम मिळावे. महात्मा गांधी एक समाजसुधारक तर होतेच तसेच ते मुलगामी क्रांतीकारक होते. जो देश विविध प्रचंड जातीसमूहात विभागला आहे. त्या देशातील एका-एका जातीला घेवून विकास व सुधारणा करता येत नाहीत. म्हणून त्यांनी समाजातील सर्वांत उपेक्षित, तिरस्कृत आणि खालच्या व्यक्तिला हरिजन ही पदवी दिली. त्यांना सन्मान व प्रतिष्ठेचे स्थान दिले. यामुळे जाति-जातीतील छोटे-मोठे वाद नष्ट झाले. वर्तमानातील शिक्षण प्रणालीने दलित वर्गाच्या विकासासाठी गांधी मार्फत जे प्रयत्न केले त्यास पुढे चालू ठेवून दलितांच्या शैक्षणिक विकासामार्फत समाजात त्यांची स्थिति सुदृढ करण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे दलितांच्या विकासातील गांधीचे योगदान नाकारता येत नाही. गांधीजी आणि दलित सेवक संघाच्या साह्याने या समुहाच्या शैक्षणिक कार्यक्रमाचा मार्ग प्रशस्त झाला. महात्मा गांधी दलित विकासाचे समर्थक होते. त्यांच्या स्थितित आमूलाग्र बदल करु इच्छित होते. त्यांच्यावर होणाऱ्या प्रत्येक अन्यायाचे उन्मूलन शिक्षणाच्या साह्याने करता येते. महात्मा गांधींनी सांगितलेल्या



Scanned by CamScanner

मार्गाचा वापर करून दलित समूहाच्या शैक्षणिक विकासासाठी त्यांचे स्थान सुदृढ करता येते. तसेच शिक्षणासाठीच्या मुलभूत आवश्यकता त्यांच्यापर्यंत पोहचून त्यांचा विकास करता येतो.

**संदर्भ ग्रंथ :**


१) मूल्यव्यवस्था गांधी विचार-संपादक डॉ.पंजाब चव्हाण, निर्मल प्रकाशन, नांदेड-२०१०.

२) Relevance of Gandhian thoughts-Editors-Dr.Vasant Sanap, Mr.Shailesh Akulwar-Jaunary २०१६.

३) भारत में लोकतांत्रिक विकेंद्रीकरण और नवपंचायतीराज डॉ.राजकुमारी सुराणा-राज पब्लिशींग हाऊस-जयपूर-२०००.

४) अखंड प्रेरणा गांधीवादाची संपादन-रघुनाथ माशलकर-सकाळ प्रकाशन, पुणे-२०११.


❑❑❑

Scanned by CamScanner